स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२३ दिनांक :- ११ डिसेंबर २०२३

जळगाव. दि.११ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेला उद्या दि.१२ डिसेंबर पासून प्रारंभ होत आहे. दोन दिवस चालणाऱ्या या संशोधन स्पर्धेत ३४७ प्रवेशिकांचा सहभाग आहे.

मंगळवार दि.१२ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता या स्पर्धेचे उद्घाटन इंडीयन केमिकल टेक्नॉलॉजीच्या जालना येथील कॅम्पसचे संचालक प्रा.उदय अन्नापूरे यांच्याहस्ते होणार असून कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी अध्यक्षस्थानी राहतील. या स्पर्धेत ५६३ विद्यार्थ्यांच्या एकूण ३४७ प्रवेशिका आहेत. त्यामध्ये ३०६ पोस्टर्स व ४१ मॉड्युल्य आहेत. परवा १३ डिसेंबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता पारितोषिक वितरण समारंभ होणार असल्याची माहिती समन्वयक प्रा.जे.व्ही.साळी व विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा.जयेंद्र लेकुरवाळे यांनी दिली.

## बातमी क्र.२

जळगाव. दि.११ (प्रतिनिधी) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारत @ २०४७ : व्हॉईस ऑफ युथ या अंतर्गत केलेल्या ऑनलाईन मार्गदर्शनाचा लाभ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यापीठातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने घेतला.

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिग व्दारे देशातील शैक्षणिक संस्थांचे कुलगुरु, प्राध्यापक व विद्यार्थी यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे थेट प्रसारण पाहण्यासाठी विद्यापीठाच्या पर्यावरण व भूगर्भ शास्त्र प्रशाळेतील मिडीया सेंटर मध्ये व्यवस्था करण्यात आली होती. प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांच्यासह विविध प्रशाळांचे संचालक, प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी